नि. फौ.ख.क्र. ५७ /२०२१
सरकार–वि–राहूल व इतर
निशाणी क्र. ४२.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ यांची साक्ष–**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव – नितिन श्रीराम नागोसे,**
**वय – ४२ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी,**
**राहणार – त्रीमूर्ती नगर, नागपूर.**

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.डी.आय.बारसकर वकीलांमार्फत.**

**०१)** मी फिर्यादीला ओळखतो, ती माझी साळी आहे. तसेच मी सर्व आरोपींना देखील ओळखतो. आरोपी क्र. ०१ राहूल हा फिर्यादीचा पती आहे. पंचफूला सहारे ही फिर्यादीची सासू आहे. सचिन सहारे हा आरोपी क्र.०१ चा भाऊ आहे. नरेश कोलते हे आरोपी क्र.०१ च्या बहीणीचे पती आहेत. शुभांगी कोलते ही आरोपी क्र.०१ ची बहीण आहे. आरोपी क्र.०१ ते ०३ हे अमरावतीला राहतात, आणि आरोपी क्र.०४ व ०५ हे वर्धा येथे राहतात.

**०२)** फिर्यादीचे आरोपी क्र.०१ सोबत लग्न दिनांक १७/०५/२०२० रोजी फिर्यादीच्या माहेरी गावामध्ये झाले होते. फिर्यादी ही अंदाजे तीन वर्षापूर्वीपासून तिच्या वडीलांच्या घरी राहते. फिर्यादी तिच्या सासरी नांदायला गेली असता, तिच्या सासरच्या मंडळींनी तिला पैशांची मागणी केली. आरोपी क्र.०१ ला बाहेर पैसे द्यायचे असल्याने त्याने फिर्यादीच्या हातातील अंगठी, गळ्यातले दागिने आणि कानातले काढून घेतले. फिर्यादीचे आरोपी क्र.०१ यांच्यासोबत लग्न जुळले होते त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, ते टाटा कॅपीटल मॅनेजर म्हणून नोकरी करतात व त्यांना रु.४५,०००/– प्रति महिना पगार आहे, असे सांगितले होते.

**०३)** फिर्यादीचा मला फोन आला होता आणि सांगत होती की, आरोपी क्र.०१ व त्याच्या कूटूबींयांनी फिर्यादीचे दागिने काढून घेतले. फिर्यादीला शिवागाळ करतात, मारहाण करतात असे सांगितले. आरोपी क्र.०१ ने फिर्यादीला तिच्या माहेरी आणून सोडले व तिला पैशांची मागणी केली असल्याने माझ्या सास–यांनी श्री. रहाटे यांच्याकडून रु.२,००,०००/– घेवून ते माझ्यासमक्ष आरोपी क्र.०१ राहूल व आरोपी क्र.०३ ला दिले. आरोपी फिर्यादीला वारंवार पैशांची मागणी करत असल्याने आम्हाला शंका आल्याने आम्ही टाटा कॅपीटल

अमरावती येथे गेलो व चौकशी केली असता आम्हाला माहित पडले की, आरोपी क्र.०१ ला रु.४५,०००/– पगार नसून त्याला साडे नऊ हजार रुपये पगार आहे व त्यांनी आम्हाला हे देखील सांगितले की, आरोपी क्र.०१ चा कॉन्ट्रॅक्ट याच महिन्यात संपत आहे. आरोपी क्र.०१ दोन वर्षाकरीता नोकरीस लागला होता. आरोपी क्र.०१ ने फिर्यादीला तिच्या माहेरी सोडले, तिला दिवाळी झाल्यानंतर घेवून जातो असे म्हणाला परंतू आला नाही. त्यामुळे आम्ही आरोपींना बोलण्याकरीता फिर्यादीच्या वडीलांच्या घरी बोलावले. त्यावेळी सर्व आरोपी आले होते. त्यांना पगाराबाबत खोटे का सांगितले याबाबत विचारणा केली असता, त्यांनी फिर्यादी व तिच्या वडीलांना माझेसमक्ष शिवीगाळ केली व मारहाण देखील केली. पोलीसांनी चौकशी करुन माझे बयाण नोंदवले होते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे श्रीमती यु.आर.पवार वकिलांमार्फत उलटतपास.</u>**

**०४)** फिर्यादी व आरोपी क्र. ०१ चे लग्न दिनांक १७/०५/२०२० रोजी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे झाले. त्यावेळी अंदाजे १०० लोक हजर होते. आरोपी यांच्याकडून अंदाजे दहा ते पंधरा लोक दोन गाड्यामध्ये आले होते. त्यापैकी एक गाडी वर्धावरुन आली होती. हे म्हणणे **खरे आहे** की, ज्यावेळी फिर्यादी व आरोपी क्र. ०१ चे लग्न झाले होते त्यावेळी कोव्हीड कालावधी चालू होता. लग्न समारंभाकरीता किती लोकांना हजर राहण्याची परवानगी होती, हे मला माहित नाही. मी फिर्यादीचे वडीलांचे चार नंबरचे मुलीचा पती आहे. माझ्या सास–यांनी किती लोकांची परवानगी काढली होती हे मला महित नाही. लग्नाच्या बोलणी करीता मी हजर होतो. फिर्यादी व आरोपी क्र.०१ चे लग्न माझ्या मामीने जोडले होते. आरोपी क्र.०१ यांचे घरच्याबद्दल मला संपूर्ण माहिती नाही.

**०५)** आरोपींकडून लग्नामध्ये आरोपी क्र.०१, त्याची बहीन, आई, भाऊ, वडील, एक मित्र इत्यादी लोक मला माहित आहे व इतर लोक आमचे पाहूणे व गावातील लोक होते. फिर्यादी व आरोपी क्र.०१ यांच्या लग्नानंतर त्यांच्या घरी मी अथवा आमच्या घरातील कोणीही कथेकरीता गेलो नाही. नवरी आरोपींसोबत एकटीच गेली होती. त्यावेळी कोव्हीड कालावधी सुरु होता.

०६) मला फिर्यादीचा फोन कोणत्या तारखेस आला होता ती तारीख मी निश्चीतपणे सांगु शकत नाही. लग्नानंतर अंदाज एका आठवड्यानंतर फिर्यादीचा मला फोन आला होता. हे म्हणणे **खरे आहे** की, आरोपी क्र.०१ ची आई व भाऊ मेस चालवतो हे मला माहित आहे. माझ्या सास–यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपींनी फिर्यादीच्या हातातील अंगठी, गळ्यातले दागिने आणि कानातले काढून घेतले हे खोटे सांगितले. हे म्हणणे **खरे नाही** की, कोव्हीड कालावधी असल्याने लग्नात कुठल्याही प्रकारची मागणी करण्यात आली नव्हती व ती पूर्ण देखील करण्यात आली नव्हती. हे म्हणणे **खरे नाही** की, लग्न अत्यंत साध्या पध्दतीने पार पडले.

०७) मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे सर्व आरोपी फिर्यादीच्या वडीलांच्या घरी आले होते परंतू ते कोणत्या तारखेला आले होते ती तारीख मला निश्चीतपणे आठवत नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, माझ्यासमक्ष आरोपींनी फिर्यादी व तिच्या वडीलांसोबत वादविवाद केला, हे खोटे सांगत आहे. मी माझे बयाण पोलीसांना देतेवेळी सांगितले होते की, आरोपींनी फिर्यादी व तिच्या वडीलांना माझेसमक्ष शिवीगाळ केली व मारहाण देखील केली असे सांगितले, परंतू सदरहू बाबी माझे बयाणामध्ये नमूद नाहीत याचे निश्चीत कारण मी सांगू शकत नाही. माझ्या मामीनी आम्हाला सांगितले की, आरोपी क्र. ०१ हा टाटा कॅपीटल अमरावती येथे मॅनेजर म्हणून काम करतो व त्याला रु.४५,०००/– प्रति महिना पगार आहे. तसेच सदरहू बाब आम्हाला आरोपी व त्याच्या घरच्यांनी देखील सांगितली. आरोपीला टाटा कॅपीटल मध्ये रु.४५,०००/– पगार नसून साडे नऊ हजार रुपये पगार आहे, ही बाब आम्हाला त्यांच्या लग्नाच्या एक महिन्यानंतर कळाली. त्यानंतर आम्ही आरोपी क्र.०१ चे नोकरीच्या ठिकाणी त्यांच्या लग्नाच्या अंदाजे एक महिन्याने गाडी करुन गेलो होतो.

**प्रश्न** – तुम्ही आरोपी क्र. ०१ च्या नोकरीच्या ठिकाणी गेले त्यावेळी संपूर्ण लॉकडाऊन होते?

**उत्तर** – आम्ही परवानगी घेवून गेलो होतो.

०८) हे म्हणणे **खरे नाही** की, सदरहू कालावधी दरम्यान संपूर्ण ऑफीस बंद होते व वर्क फ्रॉम होम चालू होते. फिर्यादीच्या वडीलांनी आरोपी क्र.०१ व त्याच्या भावाला रु.२,००,०००/– दिनांक २०/०९/२०२० रोजी दिले होते. ते आरोपीला काम असल्यामुळे दिले होते. परंतु त्याबाबतचा लेखी दस्त तयार केला नव्हता. हे म्हणणे **खरे नाही**

की, मी माझी साळी फिर्यादी हिच्यावतीने न्यायालयात साक्ष देण्याकरीता आलो असल्याने आरोपींना फसवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपींनी फिर्यादीला अथवा तिच्या वडीलांना पैशांची मागणी केली नाही, पैशांची देवाणघेवाण झाली नाही अथवा कुठलीही घटना माझ्यासमक्ष झाली नाही. हे म्हणणे **खरे नाही** की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास काही नाही.**

**वा.दा.का.दा.**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**
दिनांक २९/०८/२०२३

**श्रवणोत्तर स्वीकृत**
**समक्ष**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**

**नि. फौ.ख.क्र. ५७ /२०२१**
**सरकार–वि–राहूल व इतर**
**निशाणी क्र. ४२.**

## प्रमाणपत्र

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. ए. मिसाळ